


महाराष्ट्र शासनाच्या यादीवरील अंक...

साप्ताहिक RNI : MAH/MAR/2011/40762 पोस्टल नंबर : MCW/354/2021-23

# धगधगती मुंबई

website:www.dhagdhagtimumbai.in E-mail : dhagdhagtimumbai@gmail.com

वर्ष : १६ अंक : २६, संपादक - भिमराव हिंदुराव धुळप मंगळवार, दिनांक ११ ऑगस्ट २०२६ ते १७ ऑगस्ट २०२६ पाने : ४ मूल्य : २ रुपये

## शरद पवारांच्या उपस्थितीत ‘वनरंग २०२६’चा दिमाखदार सोहळा; नरहरी झिरवाळांच्या उपक्रमाचे कौतुक

मुंबई : जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून मुंबईतील नरिमन पॉइंट येथील वाय. बी. चव्हाण सेंटरमध्ये आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय ‘वनरंग २०२६’ आदिवासी संस्कृती महोत्सवाचा उत्साहात समारोप झाला. या महोत्सवाला राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांची विशेष उपस्थिती लाभली. आदिवासी समाजाच्या कला, संस्कृती, परंपरा आणि जीवनशैलीला व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले.

महोत्सवात भिल्ल, कोकणा, ठाकूर आणि गोंड समाजाच्या पारंपरिक लोककला, लोकनृत्य, लोकसंगीत, हस्तकला, वेशभूषा तसेच पारंपरिक खाद्यसंस्कृतीचे दर्शन घडले. आदिवासी कलाकारांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांना मुंबईकरांचा उत्स्फूर्त



प्रतिसाद मिळाला.

आदिवासी समाजाच्या विकासासाठी शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्याबरोबरच त्यांच्या पारंपरिक कला व संस्कृतीचे जतन करण्यावर भर देण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली. आदिवासी तरुणांसाठी ट्रायबल इंडस्ट्रियल क्लस्टर आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसारख्या उपक्रमांवरही भर दिला जात असल्याचे सांगण्यात आले.

यावेळी प्रतिभाताई पवार, पद्मश्री तारपा वादक भिकल्या धिंडा, युगेंद्र पवार, माजी आमदार सुनील भुसारा यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. आदिवासी संस्कृतीचा गौरव आणि समाजाच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प या महोत्सवातून अधोरेखित झाला.

## दिव्यांगांच्या सक्षमीकरणाला शासनाची सर्वोच्च प्राथमिकता : मुख्यमंत्री फडणवीस

नागपूर (प्रतिनिधी): दिव्यांग व्यक्तींना शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि सामाजिक क्षेत्रात सन्मानाने जगता यावे, यासाठी शासन विविध योजनांच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्नशील आहे. दिव्यांगांच्या सक्षमीकरणाला सर्वोच्च प्राधान्य असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

नागपूर जिल्ह्यातील अस्थिव्यंग व कर्णबधिर दिव्यांग व्यक्तींना मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते नि:शुल्क जयपूर फूट साहित्य तसेच विविध सहाय्यक साधनांचे वाटप करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. जयपूर फूटसह कृत्रिम हात-पाय आणि अन्य सहाय्यक साधनांमुळे दिव्यांग व्यक्तींच्या दैनंदिन जीवनात मोठे सकारात्मक परिवर्तन घडते. भगवान महावीर विकलांग सहाय्यता समिती १९७५ पासून देश-विदेशात दिव्यांगांसाठी उल्लेखनीय कार्य करीत असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

कर्णबधिर मुलांवर लहान वयात उपचार झाल्यास त्यांची ऐकण्याची व बोलण्याची क्षमता विकसित होण्यास मदत होते. कॉक्लिअर इम्प्लांटसाठी येणारा सुमारे ६ ते ८ लाख रुपयांचा खर्च राज्य शासनाकडून करण्यात येत आहे. दहा वर्षांखालील कर्णबधिर मुलांचे



सर्वेक्षण करून आवश्यक शस्त्रक्रिया करण्याचेही नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले.

दिव्यांगांना रोजगाराचे साधन उपलब्ध करून देणे तसेच गृहनिर्माण व अन्य योजनांमध्ये प्राधान्य देण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. दिव्यांगांचे मानधन २,५०० रुपये करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

यावेळी मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांच्यासह लोकप्रतिनिधी व मान्यवर उपस्थित होते.

## महाराष्ट्रात होणार राष्ट्रीय शहरी सहकारी वित्त व विकास महामंडळाचे मुख्यालय - अमित शाह

मुंबई : देशातील शहरी सहकारी बँकिंग क्षेत्राला आधुनिक, सुरक्षित, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधिष्ठित करण्यासाठी ‘अंब्रेला ऑर्गनायझेशन’ महत्त्वाची भूमिका बजावेल. या संस्थेच्या माध्यमातून देशातील प्रत्येक तहसीलपर्यंत शहरी सहकारी बँकिंगचे जाळे विस्तारण्यास चालना मिळेल, असा विश्वास केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांनी व्यक्त केला. तसेच राष्ट्रीय शहरी सहकारी वित्त व विकास महामंडळाचे (NUCFDC) मुख्यालय दिल्लीहून महाराष्ट्रात हलविण्याची घोषणा त्यांनी केली.




मुंबईतील बीएसई इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटरमध्ये आयोजित ‘सहकार नव-क्रांती मेळावा’मध्ये ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सहकार राज्यमंत्री कृष्णपाल गुर्जर, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यासह सहकार क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

देशात सुमारे १,४०० शहरी सहकारी बँकांमध्ये सहा लाख कोटी रुपयांच्या ठेवी असून, छोटे व्यापारी, एमएसएमई, महिला बचत गट आणि मध्यमवर्गीयांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यात या बँकांची भूमिका महत्त्वाची असल्याचे शाह यांनी सांगितले.

अंब्रेला संस्थेच्या माध्यमातून बँकांना सायबर सुरक्षा, आधुनिक सॉफ्टवेअर, प्रशिक्षण आणि सुरक्षा संचालन केंद्राची सुविधा मिळणार आहे. यावेळी शहरी सहकारी बँकांसाठी सिक्युरिटी ऑपरेशन्स सेंटर (SOC) चे उद्घाटन तसेच राष्ट्रीय फॉरेन्सिक सायन्स विद्यापीठ आणि NUCFDC यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला.




## धारावी पुनर्वसन प्रकल्पात १,६९३ झाडांवर गंडांतर ?

### मंजुरीपूर्वीच वृक्षतोड झाल्याचा किशोरी पेडणेकर यांचा गंभीर आरोप

मुंबई : धारावी पुनर्वसन प्रकल्पांतर्गत विकासकामांसाठी प्रस्तावित वृक्षतोडीवरून मुंबई महापालिकेत पुन्हा एकदा वाद निर्माण झाला आहे. २८ जुलै रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरणाच्या सभेत विरोधी पक्षनेत्या किशोरी पेडणेकर यांनी मंजुरी मिळण्यापूर्वीच झाडे तोडण्यात आल्याचा गंभीर आरोप करत प्रशासनाला जाब विचारला.

'जी/उत्तर' विभागातील धारावी डिव्हिजनमध्ये, धारावी पुनर्वसन प्रकल्पांतर्गत शहर सर्वेक्षण क्रमांक २ (भाग) व ३ (भाग), सब प्लॉट-बी, धारावी नोटिफाईड एरिया (डीएनए) येथील इमारत बांधकामासाठी प्रस्तावित उत्खननाच्या कामात अडथळा ठरणारी एकूण १,६९३ झाडे कापणे व पुनर्रोपित करण्याचा प्रस्ताव वृक्ष प्राधिकरणासमोर ठेवण्यात आला होता.

महापालिकेच्या नोंदीनुसार, ८७१ झाडे कापण्यास आणि ८२२ झाडांचे पुनर्रोपण करण्यास परवानगी मागण्यात आली आहे. हा प्रस्ताव मे. नवभारत मेगा डेव्हलपर्स प्रा. लि. यांनी ८ मे २०२६ रोजी सादर केला होता. अर्जातील त्रुटींची पूर्तता १०



जुलै २०२६ रोजी करण्यात आली.

महापालिकेच्या उद्यान विभागाने १५, १८ आणि १९ मे २०२६ रोजी स्थळपाहणी केली. या पाहणीत संबंधित जागेवर १,९९८ झाडे आणि उन्मळून पडलेली ७ झाडे, अशी एकूण २,००५ झाडे अस्तित्वात असल्याचे नमूद करण्यात आले. त्यापैकी विकासकामामुळे १,६९३ झाडे बाधित होत असल्याचे अहवालात स्पष्ट करण्यात आले.

(उर्वरित वृत्त पान ३ वर)

### धारावी पुनर्विकासाविरोधातील आंदोलन तीव्र होणार; १५ ऑगस्टला तिरंगा रॅली

मुंबई : धारावी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत धारावीकरांना ३५० ऐवजी ५०० चौ. फुटांचे घर द्यावे, तसेच पात्र-अपात्र असा भेद न करता सर्वांचे धारावीतच पुनर्वसन करावे, अशी मागणी धारावी बचाव आंदोलनाने केली आहे. दुसरीकडे, मिठागराच्या जागेसह कुर्ला दूध डेअरीच्या जागेवरील पुनर्वसन रद्द करावे, अशी मागणी मुलुंड आणि कुर्लावासीयांनी केली आहे. सरकार या मागण्यांकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. त्यामुळे आंदोलन तीव्र करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. स्वातंत्र्यदिनी, १५ ऑगस्टला धारावी, मुलुंड पूर्व आणि कुर्ला दूध डेअरी येथे तिरंगा रॅली काढण्यात येणार आहे. त्यानंतर दहा दिवसांनी संयुक्त आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती आंदोलकांनी दिली.

## संपादकीय

# भान हरपलेला समाज....!

नियम हे केवळ कागदावर लिहिण्यासाठी नसतात; ते समाजाच्या सुरक्षिततेसाठी, आरोग्यासाठी आणि शिस्तीसाठी असतात. मात्र नियम पाळणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे, याचे भान समाज हरवून बसला की प्रशासनाला कठोर भूमिका घ्यावी लागते. अशावेळी तुकाराम मुंढे यांच्यासारखे कर्तव्यदक्ष अधिकारी पुढे येतात आणि नियमांची अंमलबजावणी करतात. मग जनता त्यांच्या कामाचे कौतुक करते, अभिनंदनाचा वर्षाव करते; पण नियम पायदळी तुडविणाऱ्यांना मात्र अशाच अधिकाऱ्यांची कारवाई खटकते. म्हणूनच त्यांच्या १७ वर्षांच्या कारकीर्दीत तब्बल १९ वेळा बदली झाली, हे वास्तव विचार करायला लावणारे आहे.

मुंढे यांच्याकडे कोणतेही खाते सोपवले गेले की ते त्या खात्याच्या नियमांनुसारच काम करतात. वेगळे निकष लावत नाहीत. फरक एवढाच की, आधीच्या काळात दुर्लक्षित राहिलेल्या नियमांची ते कठोरपणे अंमलबजावणी करतात. त्यामुळे त्यांच्यासारखा अधिकारी समोर आला की, सामान्य नागरिकांना दिलासा मिळतो; तर नियमबाह्य काम करणाऱ्यांची घाबरगुंडी उडते.

अन्न व औषध प्रशासनाची सूत्रे हाती घेतल्यानंतर मुंढे यांनी भेसळखोरांविरुद्ध धडक मोहीम सुरू केली. दूध, दुग्धजन्य पदार्थ, हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, उपहारगृहे, वसतिगृहातील मेस अशा विविध ठिकाणी तपासण्या आणि कारवाया करण्यात आल्या. निकृष्ट दर्जाचे अन्न, अस्वच्छता आणि नियमांचे उल्लंघन आढळल्यास कठोर कारवाई करण्यात आली. विशेषतः दुधातील भेसळीविरोधातील कारवाईने मोठ्या यंत्रणांचे लक्ष वेधले. प्रसिद्ध डेअऱ्यांवरही छापे पडले, भेसळयुक्त पदार्थ जप्त झाले आणि नियमबाह्य आस्थापनांवर कारवाई करण्यात आली.

आता या मोहिमेचा मोर्चा शाळा, वसतिगृहे आणि विद्यार्थ्यांच्या आहाराकडे वळविण्यात आला आहे. 'सेव्ह फूड फॉर एव्हरी चाइल्ड इन महाराष्ट्र' या मोहिमेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि दर्जेदार अन्न मिळावे, हा उद्देश आहे. 'ईट राईट स्कूल' संकल्पनेतून शाळांना सुरक्षित आहार केंद्र बनविण्यावर भर दिला जात आहे. लाखो विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी संबंधित हा विषय असल्याने त्याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

शाळांमध्ये दिल्या जाणाऱ्या मध्यान्ह भोजनाचा दर्जा, धान्याची गुणवत्ता आणि स्वच्छता याबाबत अनेकदा तक्रारी झाल्या आहेत. तांदळात किडे, कडधान्यात भेसळ किंवा धान्यात खडे असल्याच्या तक्रारींकडे दुर्लक्ष होणे म्हणजे विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळ करण्यासारखे आहे. अंगणवाडीपासून बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना अन्न पुरविणाऱ्या संस्थांसाठी वैध एफएसएसएआय परवाना बंधनकारक करण्याचा निर्णय त्यामुळे महत्त्वाचा ठरतो. परवानाधारक पुरवठादारांकडूनच अन्न खरेदी झाल्यास गुणवत्ता आणि अन्नसुरक्षेवर नियंत्रण ठेवणे अधिक सुलभ होईल.

शाळेच्या परिसरापासून ५० मीटरच्या आत हाय फॅट, हाय सॉल्ट आणि अनारोग्यकारक पदार्थांच्या विक्रीवर बंदी हा आणखी एक स्वागतार्ह निर्णय आहे. अशा पदार्थांच्या जाहिरातींनाही आळा घालणे आवश्यक आहे. मात्र नियम करणे जितके महत्त्वाचे, तितकीच त्यांची सातत्याने अंमलबजावणीही महत्त्वाची आहे. यापूर्वीही शाळांच्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीवर निर्बंध होते; परंतु काही काळानंतर अंमलबजावणी शिथिल झाली. गुटख्यावर बंदी असूनही तो छुप्या पद्धतीने उपलब्ध होतो, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही.

खरा प्रश्न मात्र वेगळाच आहे—प्रत्येक वेळी नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी एखादा तुकाराम मुंढे का लागतो? स्वच्छता, सुरक्षित अन्न, आरोग्यदायी जीवनशैली आणि नियमांचे पालन ही प्रशासनाचीच नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. नियम मोडले की कारवाई व्हावी, अशी अपेक्षा आपण करतो; पण नियम पाळण्याची जबाबदारी स्वतःची आहे, हे विसरतो.

मुंढे यांनी उचललेली पावले प्रशासनाला उशिरा आलेले जागेचे भान दाखवतात. अनेक नियम पूर्वीपासून अस्तित्वात आहेत; गरज आहे ती त्यांची सातत्यपूर्ण अंमलबजावणी करण्याची. अधिकारी बदलले, मोहिमा संपल्या किंवा बातम्यांचा गाजावाजा थांबला की पुन्हा 'जैसे थे' परिस्थिती निर्माण होऊ नये. कारण शेवटी प्रश्न एका अधिकाऱ्याचा नाही, तर संपूर्ण समाजाच्या भानाचा आहे. आरोग्य, स्वच्छता आणि सुरक्षितता यासाठी प्रत्येक वेळी कठोर अधिकारी शोधण्यापेक्षा नियम पाळणारा जागरूक समाज निर्माण होणे, हीच खरी काळाची गरज आहे.

## केंद्रीय मंत्रीपदाच्या दशकपूर्तीनिमित्त १४ ऑगस्टला रामदास आठवले यांचा मुंबईत भव्य नागरी सत्कार

मुंबई: रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या केंद्रीय मंत्रीपदाच्या दहा वर्षांच्या यशस्वी कारकीर्दीनिमित्त १४ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे भव्य नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रिपब्लिकन पक्षाच्या मुंबई प्रदेशच्या वतीने प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ कासारे यांच्या अध्यक्षतेखाली होणार असल्याची माहिती पक्षाच्या नेत्यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, ज्येष्ठ नेते छगन भुजबळ, मंत्री आशिष शेलार, मंगलप्रभात लोढा, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, समाजकल्याण मंत्री संजय शिरसाट यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

पत्रकार परिषदेला राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर, राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे, मुंबई प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ कासारे आणि प्रदेश सरचिटणीस विवेक पवार उपस्थित होते. त्यांनी सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत रामदास आठवले यांनी सलग तिसऱ्यांदा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री म्हणून काम करत विक्रमी दहा वर्षांची सेवा पूर्ण केली आहे. या ऐतिहासिक कार्याचा गौरव करण्यासाठी आयोजित सोहळ्यास मुंबई-ठाणे परिसरातील आंबेडकरी समाजाने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पक्षाच्या नेत्यांनी केले.

## बृहन्मुंबई बेरोजगार व सेवा सहकारी संस्थेच्या वतीने आज मुंबईत रंगणार सहकार भूषण सोहळा

मुंबई : बृहन्मुंबई बेरोजगार व सेवा सहकारी संस्थांचे फेडरेशन लि. (बृहन्मुंबई, मुंबई शहर, मुंबई पूर्व उपनगरे तसेच मुंबई पश्चिम उपनगरे १ व २) आणि मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहकार भूषण पुरस्कार-२०२६' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम मंगळवार, दि. ११ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ३ वाजता, मुंबईतील वसंतदादा पाटील सभागृह, मुंबई बँक भवन, २०७, डॉ. डी. एन. रोड, पहिला मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ येथे होणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. ना. श्री. प्रवीण दरेकर, अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण स्वयंपुनर्विकास प्राधिकरण (कॅबिनेट दर्जा), अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित तसेच अध्यक्ष, मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. हे राहणार आहेत.

सहकार राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य मा. ना. डॉ. पंकज भोयर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

त्याच बरोबर मा. श्री. सिद्धार्थ कांबळे, उपाध्यक्ष, मुंबई बँक, मा. श्री. शिवाजीराव नलावडे, ज्येष्ठ संचालक, मा. आ. श्री. प्रसाद लाड, मा. आ. श्री. सुनील राऊत यांचे उपस्थिती देखील असेल. तसेच सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग मा. श्री. शहाजी पाटील यांच्यासह विविध मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमाला बेरोजगार व सेवा सहकारी संस्थांचे मार्गदर्शक मुंबई बँकेचे विद्यमान संचालक मा. श्री. नंदकुमार काटकर तसेच मुंबई बँकेचे संचालक मा. श्री. जिजाबा पवार, मा. श्री. प्रकाश दरेकर, मा. श्री. विठ्ठलराव भोसले, मा. श्री. आनंदराव गोळे, मा. श्री. अनिल गजरे, मा. श्री. विनोद बोरसे, मा. श्रीमती जयश्री पांचाळ, मा. श्री. संदीप घनदाट, मा. श्री. पुरुषोत्तम दळवी, मा. श्री. विष्णू घुमरे, मा. श्रीमती शिल्पा सरपोतदार आणि मा. श्रीमती कविता देशमुख यांची उपस्थिती राहणार आहे.

तसेच मुंबई बँकेचे कार्यकारी संचालक मा. श्री. संदीप सी. सुर्वे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या पुरस्कार सोहळ्यात बेरोजगार व सेवा संस्थांच्या माध्यमातून सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरव करण्यात येणार असून, कार्यक्रमादरम्यान व्यावसायिक व प्रेरणादायी वक्त्यांचे मार्गदर्शनही लाभणार आहे.

सहकार क्षेत्रातील विविध संस्था, पदाधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## घाटकोपरमध्ये रंगणार कोकणच्या मातीचा विनोदी जल्लोष!

### 'वाजला गजर... शाळेचा नको रे बाबा गेट टुगेदर'चा २३ ऑगस्टला पहिला प्रयोग; कोकणवासीय कलाकारांची धमाल मेजवानी




मुंबई : कोकणच्या मातीतून आलेल्या कलावंतांच्या उत्स्फूर्त अभिनयाची आणि विनोदाची धमाल मुंबईकरांना अनुभवायला मिळणार आहे. नवतरुण सेवा मंडळ, कोळबांद्रे-दवंडेवाडी (रजि.) आणि आदर्श महिला मंडळ, दवंडेवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व क्रीडा उपक्रमांचा एक भाग म्हणून 'वाजला गजर... शाळेचा नको रे बाबा गेट टुगेदर' या धम्माल विनोदी दोन अंकी नाटकाचे आयोजन करण्यात आले आहे.

या नाटकाचा पहिला प्रयोग रविवार, २३ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ३ वाजता घाटकोपर (पूर्व) येथील झवेरबेन पोपटलाल सभागृहात रंगणार आहे. कोकणवासीयांनी एकत्रितपणे निर्मिती केलेल्या या नाटकातून शाळेच्या गेट-टुगेदरच्या निमित्ताने घडणाऱ्या गंमती-जमती, नातेसंबंध आणि आठवणींवर विनोदी पद्धतीने भाष्य करण्यात आले आहे.

नाटकाचे लेखन व दिग्दर्शन गणेश शिवराम दवंडे यांनी केले असून, संगीत व नेपथ्य संकल्पना धनंजय-शैलेश, प्रकाश योजना संतोष नार्वेकर तर रंगभूषा गंगाराम गोताड यांची आहे.

नाटकात गणेश दवंडे, राजेश हरावडे, महेंद्र दवंडे, दशरथ बेर्डे, नितीन दवंडे, अविनाश बेर्डे, रविंद्र खळे, अक्षय हरावडे, विश्वनाथ दवंडे, अनिशा खळे, प्रज्ञा दवंडे, साक्षी खळे, श्रेया बेर्डे आणि पूजा खळे हे कलाकार आपल्या अभिनयाची जुगलबंदी सादर करणार आहेत.

या नाटकाच्या पहिल्याच प्रयोगाला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून प्रयोग हाऊसफुल्ल होण्याच्या दिशेने वाटचाल करत असल्याचा आनंद आयोजक व निर्मात्यांनी व्यक्त केला आहे.

कोकणवासीयांनी मुंबईत सादर केलेल्या या खास विनोदी नाटकाला मुंबईकर रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दाद द्यावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

**तिकीट दर : ₹२५०/- व ₹२००/-**
**तिकिटांसाठी संपर्क :**
हेमंत – ९६१९४४८५२७,
रोशन – ८६५५५८९५८५,
पंकज – ७२०८८८०१६६,
अजय – ९०२९३९६५७०
यांच्याशी संपर्क करावा.

# डॉ. गोरखनाथ पोळ यांच्या 'मी GEN X... एका Gen Z चा बाबा' पुस्तकाचे कामोठ्यात दिमाखदार प्रकाशन

पनवेल : आजच्या Gen Z पिढीला दोष देण्यापेक्षा तिचे विचार, स्वप्ने आणि भावविश्व समजून घेऊन पालक व मुलांमधील संवाद अधिक दृढ करण्याची गरज आहे, असा सकारात्मक संदेश देणाऱ्या डॉ. गोरखनाथ पोळ लिखित 'मी GEN X... एका Gen Z चा बाबा' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा कामोठे येथील सुषमा पाटील विद्यालय व ज्युनिअर कॉलेज येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

बदलत्या काळानुसार दोन पिढ्यांच्या विचारसरणी, जीवनशैली, तंत्रज्ञानाचा वापर, शिक्षण, करिअर, नातेसंबंध, संस्कार आणि संवादाच्या पद्धतीमध्ये मोठे बदल झाले आहेत. या बदलांकडे संघर्षाच्या दृष्टिकोनातून न पाहता Gen X आणि Gen Z या दोन पिढ्यांमध्ये संवादाचा सेतू निर्माण व्हावा, या उद्देशाने डॉ. गोरखनाथ पोळ यांनी हे पुस्तक लिहिले आहे.

शिक्षण क्षेत्रातील आपल्या प्रदीर्घ अनुभवासोबतच एका वडिलांच्या भूमिकेतून लेखकाने Gen Z पिढीकडे पाहण्याचा प्रयत्न या पुस्तकातून केला आहे. आजच्या तरुणांचे स्वतंत्र विचार, त्यांची स्वप्ने, तंत्रज्ञानाशी असलेले नाते, करिअरविषयक बदललेला दृष्टिकोन तसेच पालकांच्या अपेक्षा आणि मुलांच्या भावना यांचा सहज, संवेदनशील आणि सकारात्मक पद्धतीने वेध पुस्तकात घेण्यात आला आहे.

"Gen Z ला बदलण्याआधी त्यांना समजून घेऊया; उपदेशापेक्षा संवादाला आणि अपेक्षांपेक्षा विश्वासाला अधिक महत्त्व देऊया," हा पुस्तकाचा मध्यवर्ती विचार असून, पालक, शिक्षक आणि तरुण पिढी यांच्यातील वाढती दरी कमी करण्यासाठी हे पुस्तक महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे उपस्थित मान्यवरांनी यावेळी नमूद केले.



प्रकाशन सोहळ्यास सुषमा पाटील विद्यालयाचे संस्थापक-चेअरमन दिलीप पाटील, कामोठे येथील नगरसेवक विकास घरत, डॉ. भगत, आंतरराष्ट्रीय वक्ते डॉ. पवन अग्रवाल, डॉ. मंदार पनवेलकर, डॉ. अनंत धरणेकर, श्रावण घरत, सुविद्या विद्यालयाचे चेअरमन, जाधव, केतकी प्रकाशनचे संस्थापक चंद्रकांत जाधव, बाळासाहेब फडतरे, स्मिता पनवेलकर, रमेश संकपाळ, भाई पाटील, विजय पाटील, राहुल राणे, प्रकाश वाळुंज, संजय किसवे, अर्जुन गोवारी, दिलीप गुप्ता यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी माइंडसेट गुरू प्रा. दिनेश गुप्ता, विजय सावंत सर, गोरख जेधे, फडतरे सर, सुयश सामाजिक शिक्षण संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष रमेश संकपाळ सर तसेच सामाजिक कार्यकर्ते सुरेश खरात यांचीही उपस्थिती होती.

उपस्थित मान्यवरांनी पुस्तकाच्या विषयाचे विशेष कौतुक केले. पालकांनी केवळ मुलांना शिकवण्याऐवजी त्यांच्याशी संवाद साधणे, त्यांच्या भावनांचा आदर करणे आणि बदलत्या पिढीला समजून घेणे आवश्यक आहे.

या दृष्टीने हे पुस्तक केवळ Gen Z विषयीचे पुस्तक नसून पालक, शिक्षक आणि तरुण पिढी यांच्यात परस्पर समज, विश्वास आणि संवाद वाढविणारा महत्त्वपूर्ण प्रयत्न असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## मुंबई महापालिकेचे सभागृहही होणार पेपरलेस; २३७ नगरसेवकांना महिनाभरात टॅब




मुंबई : मुंबई महापालिकेचा प्रशासकीय कारभार पेपरलेस करण्याच्या दिशेने प्रशासनाने आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. प्रशासकीय कामकाजानंतर आता महापालिकेचे सभागृह आणि विविध समित्यांचे कामकाजही डिजिटल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार महापालिकेतील २२७ निवडून आलेले आणि १० नामनिर्देशित अशा एकूण २३७ नगरसेवकांना येत्या महिनाभरात टॅब देण्यात येणार आहेत.

या टॅबच्या माध्यमातून सभागृह तसेच विविध समित्यांच्या पटलावर मांडण्यात येणारे प्रस्ताव, विषयपत्रिका आणि संबंधित कागदपत्रे डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून दिली जाणार आहेत. सध्या स्थायी, शिक्षण, सुधार, आरोग्य, महिला व बालकल्याण, विधी व महसूल यांसह विविध समित्यांच्या बैठकींसाठी शेकडो पानांच्या प्रस्तावांची छपाई केली जाते.

टॅबच्या वापरामुळे कागद, छपाई, वाहतूक आणि वितरणावरील खर्चात बचत होणार असून वेळही वाचणार आहे. तसेच कागदाचा वापर कमी झाल्याने पर्यावरणपूरक प्रशासनाला चालना मिळणार आहे. महापालिकेच्या पेपरलेस कारभाराला या निर्णयामुळे आणखी वेग मिळणार आहे.

# रुग्णांच्या आरोग्याशी खेळ सुरूच....!

## शिवडीच्या टी.बी. रुग्णालयात झुरळांचा सुळसुळाट

## समाजसेविका वैशाली गावडे यांचा आंदोलनाचा इशारा

मुंबई (रमेश औताडे) : मुंबई महानगर पालिकेच्या सर्वात मोठ्या अर्थसंकल्पाचा गवगवा केला जात असताना, दुसरीकडे महापालिकेच्या रुग्णालयांमधील आरोग्य व्यवस्थेचे विदारक चित्र समोर येत आहे. शिवडी येथील मुंबई महापालिकेच्या टी.बी. रुग्णालयात झुरळांचा सुळसुळाट, अस्वच्छता आणि अपुऱ्या स्वच्छता व्यवस्थेमुळे रुग्णांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गंभीर आजारावर उपचार घेण्यासाठी आलेल्या रुग्णांना उपचारांसोबतच अस्वच्छतेशीही सामना करावा लागत असल्याचा आरोप समाजसेविका तथा महलत महिला मंडळाच्या अध्यक्षा वैशाली गावडे यांनी केला आहे.

गावडे यांनी रुग्णालयाची प्रत्यक्ष पाहणी करून तेथील परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी रुग्णालय परिसरातील अस्वच्छता आणि झुरळांचा वाढता प्रादुर्भाव पाहून त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. रुग्णालय हे आरोग्य देण्याचे ठिकाण असताना तेथेच संसर्गाला आमंत्रण देणारी परिस्थिती निर्माण होणे ही गंभीर बाब आहे, असे त्यांनी सांगितले.

याबाबत संबंधित प्रशासनाला निवेदन देऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे. मात्र, केवळ कागदी कारवाई न करता मुंबई महापालिका प्रशासनाने वरिष्ठ अधिकाऱ्यांसह रुग्णालयाची तातडीने पाहणी करून प्रत्यक्ष परिस्थितीची तपासणी करावी आणि स्वच्छता व्यवस्थेतील त्रुटी त्वरित दूर कराव्यात, अशी मागणी होत आहे.

झुरळांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रभावी कीटकनियंत्रण, नियमित स्वच्छता आणि रुग्णांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. निवेदनानंतरही ठोस कारवाई न झाल्यास आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा वैशाली गावडे यांनी दिला आहे.

तसेच लवकरच पत्रकार परिषद घेऊन संपूर्ण वस्तुस्थिती जनतेसमोर मांडणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आता महापालिका प्रशासन या गंभीर तक्रारीची तातडीने दखल घेऊन जातीने लक्ष घालते का, याकडे मुंबईकरांचे लक्ष लागले आहे.

उर्वरित वृत्त पान १ वरून

## धारावी पुनर्वसन प्रकल्पात १,६९३ झाडांवर गंडांतर ?

### मंजुरीपूर्वीच वृक्षतोड झाल्याचा किशोरी पेडणेकर यांचा गंभीर आरोप

मात्र, या प्रस्तावावर चर्चा करताना विरोधी पक्षनेत्या किशोरी पेडणेकर यांनी गंभीर आक्षेप नोंदवला. त्यांनी सभागृहात सांगितले की, विकासकामांसाठी झाडे कापण्यासंदर्भात मंजुरी मिळण्यापूर्वीच वृक्षतोड होत असल्याच्या अनेक तक्रारी त्यांच्याकडे येत आहेत. विषय क्रमांक १२ मधील प्रकरणातही वृक्ष प्राधिकरणाची मंजुरी मिळण्यापूर्वीच संबंधित झाडांवर कुऱ्हाड चालविण्यात आल्याची माहिती मिळत असल्याचा दावा त्यांनी केला.

"जर प्रस्ताव मंजूर होण्यापूर्वीच झाडे तोडली जात असतील, तर भविष्यात प्रत्येक प्रस्तावाची अध्यक्षांसह प्रत्यक्ष स्थळपाहणी करूनच मंजुरी द्यावी लागेल. या प्रकरणात स्थळपाहणी करणाऱ्या उद्यान विभागाच्या अधिकाऱ्यांनी सभेत वस्तुस्थिती स्पष्ट करावी," अशी मागणीही पेडणेकर यांनी केली.

धारावी पुनर्वसनासारख्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पात पर्यावरणीय नियमांचे पालन होत आहे का, तसेच मंजुरीपूर्वी वृक्षतोड झाल्याच्या आरोपांची चौकशी होणार का, याकडे आता पर्यावरणप्रेमींसह मुंबईकरांचे लक्ष लागले आहे.

# सुनेत्रा पवार यांच्या कराड दौऱ्याने जिल्हा बँकेच्या राजकारणाला वेग; उंडाळकरांशी कमराबंद चर्चा

कराड : नियोजित कोल्हापूर दौऱ्यावर जात असताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी कराड येथे अल्पकाळ भेट देत स्थानिक राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांशी गाठीभेटी घेतल्या. यावेळी त्यांनी विविध विषयांवर चर्चा करत पदाधिकाऱ्यांकडून निवेदनेही स्वीकारली. त्यांच्या धावपळीच्या दौऱ्यातील कराड भेट राजकीयदृष्ट्या महत्त्वाची ठरली आहे.

या भेटीदरम्यान ॲड. उदयसिंह पाटील-उंडाळकर यांच्याशी सुनेत्रा पवार यांनी काही काळ कमराबंद चर्चा केली. या चर्चेत जिल्हा बँकेच्या आगामी निवडणुकीसंदर्भात चर्चा झाल्याची माहिती राजकीय वर्तुळातून समोर येत आहे. मात्र, बैठकीत नेमकी कोणती रणनीती ठरली, कोणत्या मतदारसंघातील राजकीय समीकरणांवर चर्चा झाली किंवा राष्ट्रवादीची आगामी भूमिका काय असेल, याबाबत अधिकृत माहिती उपलब्ध झालेली नाही.

यावेळी राजेश पाटील-वाठारकर यांच्यासह स्थानिक प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. सुनेत्रा पवार यांनी पदाधिकाऱ्यांच्या अडचणी आणि स्थानिक प्रश्न जाणून घेत त्यांच्याशी संवाद साधला.

दरम्यान, उंडाळकर यांच्यासोबत झालेल्या गोपनीय चर्चेमुळे जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय चर्चांना उधाण आले आहे. स्थानिक नेत्यांच्या हालचाली, संभाव्य आघाड्या आणि



राष्ट्रवादीची भूमिका याकडे आता राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. आगामी काही दिवसांत या भेटीचे राजकीय पडसाद स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

# IIT बॉम्बेच्या दोन हॉस्टेल मेस बंद; 22 जणांवर कारवाई; तुकाराम मुंढेंच्या FDAचा धडाका

मुंबई : अन्न व औषध प्रशासनाचे (FDA) आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली अन्न सुरक्षेबाबत सुरू असलेल्या धडक मोहिमेला आणखी वेग आला असून, पवई येथील IIT बॉम्बेच्या हॉस्टेल मेसवर FDAने मोठी कारवाई केली आहे. ८ ऑगस्ट रोजी करण्यात आलेल्या या कारवाईत दोन हॉस्टेल मेस तात्काळ बंद करण्याचे आदेश देण्यात आले, तर आणखी एका मेसला सुधारणा नोटीस बजावण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित मेस अन्न सुरक्षा नियमांनुसार आवश्यक परवान्याशिवाय सुरू असल्याचे तपासणीत आढळून आले. विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या




अन्नाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने FDAने ही बाब गांभीर्याने घेत कारवाई केली. या प्रकरणात २२ जणांना अटक झाल्याचे वृत्त आहे.

दरम्यान, तुकाराम मुंढे यांनी अन्न सुरक्षेच्या मुद्द्यावर कठोर भूमिका घेतली असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या खाद्य आस्थापनांवर कोणताही दबाव न घेता कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत. पुण्यातील कार्यक्रमात त्यांनी पुढील काळात चायनीज खाद्यपदार्थ आणि मद्यविक्रीच्या ठिकाणीही तपासणी व कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत.

FDAच्या या कारवाईमुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी संबंधित अन्न सुरक्षेच्या नियमांकडे दुर्लक्ष करणाऱ्या मेस चालकांमध्ये खळबळ उडाली आहे.

## सायनच्या लोकमान्य टिळक रुग्णालयाच्या क्षमतावाढीच्या कामांना गती; प्राजक्ता वर्मा-लवंगारे यांची पाहणी



मुंबई : शीव (सायन) येथील लोकमान्य टिळक सर्वसाधारण रुग्णालयात सुरू असलेल्या क्षमतावाढ प्रकल्पाच्या कामांची अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) श्रीमती प्राजक्ता वर्मा-लवंगारे यांनी आज प्रत्यक्ष पाहणी करून आढावा घेतला. मुख्य रुग्णालय इमारत (टप्पा क्रमांक २-अ), ऑन्कोलॉजी इमारत, आपत्कालीन विभाग, विविध कक्ष, एमआयसीयू तसेच सीसीटीव्ही नियंत्रण कक्षाची त्यांनी पाहणी केली.

नव्याने विकसित होणाऱ्या रुग्णालयात नागरिकांसह निवासी डॉक्टर व कर्मचाऱ्यांसाठी विरंगुळ्याची ठिकाणे उपलब्ध करून द्यावीत, असे निर्देश त्यांनी दिले. विविध आरोग्य सेवांसाठी नागरिकांना डिजिटल पेमेंटची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.

सीसीटीव्ही नियंत्रण कक्षात नियमित कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीवर लक्ष ठेवावे, तसेच नियंत्रण कक्षातून पब्लिक अ‍ॅड्रेस सिस्टिम प्रभावीपणे राबवावी, असे निर्देश देण्यात आले. रुग्णालयातील स्वच्छतेला प्राधान्य देताना कर्मचाऱ्यांसाठी विशिष्ट गणवेशाची व्यवस्था करावी. तसेच मूषक व श्वानांचा उपद्रव रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

रुग्णालयात हॉस्पिटल मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टिम (HMIS) प्रभावीपणे लागू करण्याचे निर्देशही वर्मा-लवंगारे यांनी दिले. यावेळी उपायुक्त प्रशांत सपकाळे, उपायुक्त शरद उघडे, संचालक डॉ. शैलेश मोहिते, सहायक आयुक्त अरुण क्षीरसागर यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांना गणवेश, शैक्षणिक साहित्य अद्याप नाही; पालिका प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह

नवी मुंबई(रमेश औताडे) : नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना गणवेश व इतर आवश्यक शैक्षणिक साहित्य वाटपाची प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)चे प्रदेश सचिव बाळासाहेब मिरजे यांनी महानगरपालिका आयुक्तांकडे निवेदन देऊन संबंधित विभागाच्या कामकाजाची चौकशी करण्याची मागणी केली आहे.

जून महिन्यात शाळा सुरू होऊन शैक्षणिक सत्राला सुरुवात झाली असतानाही काही शाळांमधील विद्यार्थ्यांना अद्याप गणवेश व इतर शैक्षणिक साहित्य मिळालेले नसल्याचे मिरजे यांनी निवेदनात नमूद केले आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वेळेत उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी असताना या विलंबामुळे पालिका प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

गणवेश व साहित्य वाटपाची जबाबदारी असलेल्या संबंधित अधिकारी तसेच कंत्राटदाराच्या कामकाजाची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच आवश्यक असल्यास या प्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी करण्याचे आदेश द्यावेत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी उर्वरित गणवेश व साहित्य तातडीने उपलब्ध करून द्यावे, अशी मागणीही मिरजे यांनी केली आहे.

## गणेशोत्सवासाठी पश्चिम रेल्वेची 21 विशेष फेऱ्यांची घोषणा; कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांना मोठा दिलासा

मुंबई : यंदाच्या गणेशोत्सवानिमित्त कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन पश्चिम रेल्वेने विशेष गाड्या चालविण्याची घोषणा केली आहे. 14 सप्टेंबर 2026 रोजी गणरायाचे आगमन होत असल्याने मुंबई, गुजरात आणि इतर भागांतून कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी 'ट्रेन ऑन डिमांड (TOD) – एक्स्ट्रा रश' योजनेअंतर्गत 8 जोड्या (16 गाड्या) आणि एकूण 21 विशेष फेऱ्या चालविण्यात येणार आहेत. रेल्वे बोर्डाच्या मंजुरीनंतर सप्टेंबर महिन्यात या गाड्या धावणार आहेत.

पश्चिम रेल्वेच्या या विशेष गाड्यांमुळे मुंबई, गुजरात, कोकण आणि कर्नाटक दरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. या सर्व गाड्या विशेष भाड्याने धावतील. मात्र बांद्रा टर्मिनस–रत्नागिरी विशेष गाडी अनारक्षित (Unreserved) स्वरूपात चालविण्यात येणार आहे.

**विशेष गाड्यांचे वेळापत्रक**

09013/09014 – मुंबई सेंट्रल–ठोकूर (साप्ताहिक) – 1 फेरी

09019/09020 – मुंबई सेंट्रल–सावंतवाडी रोड (आठवड्यातून 4 दिवस) – 8 फेऱ्या

09035/09036 – बांद्रा टर्मिनस–रत्नागिरी (साप्ताहिक, अनारक्षित) – 2 फेऱ्या

09114/09113 – वडोदरा–रत्नागिरी (साप्ताहिक) – 1 फेरी

09110/09109 – विश्वामित्री–रत्नागिरी (द्विसाप्ताहिक) – 4 फेऱ्या

09124/09123 – विश्वामित्री–रत्नागिरी (साप्ताहिक) – 2 फेऱ्या

09022/09021 – उदना–रत्नागिरी (साप्ताहिक) – 2 फेऱ्या

09030/09029 – वलसाड–रत्नागिरी (साप्ताहिक) – 1 फेरी

या विशेष गाड्यांची सविस्तर माहिती NTES आणि ICMS प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात येणार असून, आरक्षणाची सुविधा IRCTC तसेच रेल्वे आरक्षण केंद्रांवर उपलब्ध असेल. स्थानकांवर माहिती फलक, उद्घोषणा आणि सोशल मीडियाच्या माध्यमातूनही प्रवाशांना माहिती देण्यात येणार आहे.

गणेशोत्सव काळात मोठ्या प्रमाणावर होणारी प्रवासी गर्दी लक्षात घेता, प्रवाशांनी वेळेत आरक्षण करून प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन पश्चिम रेल्वेने केले आहे.

## अक्षरप्रेमींचा गौरव; स्व. राजाराम डाकवे (तात्या) साहित्य पुरस्कार जाहीर

तळमावले : पाटण तालुक्यातील डाकेवाडी (काळगाव) येथील स्पंदन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने वाचनसंस्कृतीचा जागर आणि साहित्यसेवेला प्रोत्साहन देण्यासाठी देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय स्व. राजाराम डाकवे (तात्या) साहित्य पुरस्कार २०२६ ची घोषणा करण्यात आली आहे. यंदा महाराष्ट्रातील विविध भागांतून आलेल्या ७५ हून अधिक पुस्तकांमधून परीक्षणाअंती १६ साहित्यकृतींची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

ट्रस्टचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. संदीप डाकवे यांनी ही माहिती प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली. पुरस्काराचे हे चौथे वर्ष असून, आतापर्यंत सुमारे ७५ साहित्यिकांचा गौरव करण्यात आला आहे. सन्मानपत्र, मानाचा गमजा आणि ग्रंथ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. यंदाच्या निवडीत प्रदीप बडदे यांचे माणुसकीची अंत्ययात्रा, डॉ. शिवाजी शिंदे यांचे भावगंधित व्यक्तिमत्त्वे, अमृता खंडेराव यांचे उलटं टांगलेलं भूत आणि म्हातारी, सदाशिव बर्गे यांचे शंभरची चिल्लर, कांता वि. भोसले यांचे रानफुल, तुकाराम कांबळे यांचे बिंब-प्रतिबिंब यांसह रामभाऊ डुबल, प्रकाश संकपाळ, वीणा रारावीकर, सत्यवान मंडलिक,




सुमन चंद्रशेखर, डॉ. शुभांगी कुंभार, प्रा. पौर्णिमा केरकर, वसुंधरा निकम, चुडाराम बल्हारपुरे आणि डॉ. स्वाती पाटील यांच्या साहित्यकृतींचा समावेश आहे.

पुस्तकांचे झाड, पुस्तकांची आरास, पुस्तकांची गुढी, दिवाळी अंक व निबंध स्पर्धा अशा उपक्रमांतून ट्रस्ट वाचनचळवळीला बळ देत आहे. निवड झालेल्या साहित्यिकांचा लवकरच भव्य सोहळ्यात गौरव करण्यात येणार आहे.

## विविध नागरी सुविधा कामांना स्थायी समितीची मंजुरी

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेत विविध नागरी सुविधा व पायाभूत विकासकामांच्या प्रस्तावांना स्थायी समिती सभापती अशोक भाऊसो पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

केंद्र सरकारच्या 'अमृत 2.0' अभियानांतर्गत सेक्टर 50, नेरूळ येथील 100 द.ल.लि. क्षमतेच्या मलप्रक्रिया केंद्राच्या सुधारणेसाठी नवीन पंपिंग मशीन व अनुषंगिक कामांना मंजुरी देण्यात आली. तसेच सानपाडा सेक्टर 20 येथे समुद्राच्या भरतीचे पाणी शहरात येऊ नये यासाठी फ्लॅप गेट बसविण्याच्या 28.11 लाख रुपयांच्या कामास मान्यता मिळाली.

सीबीडी बेलापूर सेक्टर 28 पंपहाऊसमधील 33 केव्ही इनडोअर फिडर पॅनल्सच्या सुरक्षिततेसाठी रूम बांधण्याकरिता 85.99 लाख रुपये मंजूर करण्यात आले. वाशी सेक्टर 16 येथे क्लोरीन युनिट प्लांट उभारण्यासाठी 25.08 लाख रुपये, तर पावणे गावासमोरील 800 मिमी जलवाहिनी बदलण्यासाठी 33.79 लाख रुपये मंजूर झाले.

नेरूळ सेक्टर 21 येथील रॉक गार्डनच्या सुधारणेसाठी 1.73 कोटी, महापे ब्रिज ते दिघा शहर सुशोभीकरणासाठी 1.30 कोटी रुपये मंजूर करण्यात आले. ऐरोलीतील विविध चाळींमध्ये गटार व पदपथ दुरुस्तीसाठी 1.14 कोटी, तर नेरूळ सेक्टर 46 मधील गटार व पदपथ सुधारणेसाठी 1.52 कोटी रुपये मंजूर करण्यात आले.

Printed and published by Bhimrao Hindurao Dhulap, Printed at Plaskot Industries, 23, Municipal Indl. Estate, K. K. Marg, Satrasta, Mumbai -400 011 and published at C/66, Mukuda Nagar, A-Ward, Laxmi Mandir, Dharavi, Mumbai - 400 017. Editor : Bhimrao Hindurao Dhulap, Mob. 9221117684
Any litigation against the content will be entertained under the jurisdiction of Mumbai only.

हे साप्ताहिक प्रकाशक, मुद्रक, मालक श्री. भिमराव हिंदुराव धुळप यांनी प्लासकोट इंडस्ट्रीज, २३, म्युनिसिपल इंडस्ट्रीयल इस्टेट, के. के. मार्ग, सातरस्ता, मुंबई -४०० ०११ येथून छापून सी/६६ मुकुंदनगर, ए/ वॉर्ड, लक्ष्मी मंदिर, धारावी, मुंबई - ४०० ०१७ येथून प्रकाशित केले. संपादक : भिमराव हिंदुराव धुळप. मो. ९२२१११७६८४
(प्रकाशित बातम्या / लेखांशी सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद मुंबई न्यायकक्षेत)